पेंशन निधि विनियामक एवं विकास प्राधिकरण
PENSION FUND REGULATORY AND DEVELOPMENT AUTHORITY

आज़ादी का अमृत महोत्सव

रिटायरमेंट एज्युकेशन अँड अवेअरनेस प्रोग्रॅम

पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण

आर्थिक चिंतांपासून फ्रीडम अर्न करा - रिप द बेनिफिट्स

nps national pension system PENSION FOR ALL

अटल पेंशन योजना मेरा अधिकार मेरा सम्मान

अनुक्रमणिका

1	सेवानिवृत्ती म्हणजे काय ते समजून घेणे	2
2	लक्षात ठेवण्याचे घटक	7
3	पेन्शन मिळवून देणाऱ्या विविध पर्यायांचे वैशिष्ट्ये: मुख्य विचार	11
4	नॅशनल पेन्शन सिस्टीमची जादू	15
5	अटल पेन्शन योजनेचे फायदे	25
	समारोप	29
	शब्दसूची	30

**नमस्कार.
मी प्रोफेसर
मनीराम.**

तुमच्यापैकी बऱ्याच जणांना सेवानिवृत्ती नियोजन आणि बचतीबद्दल जाणून घेण्यात स्वारस्य आहे हे पाहून मला आनंद झाला. मी आज तुमच्यासोबत जे शेअर करणार आहे, ते 18 वर्षांच्या किशोरवयीन व्यक्ती तसेच 70 वर्षांच्या व्यक्तींसाठी लागू होते.

डिस्क्लेमर

या पुस्तिकेत असलेली माहिती केवळ उदाहरणात्मक, माहितीपूर्ण आणि शैक्षणिक हेतूंसाठी आहे आणि पीएफआरडीए (PFRDA) चा दृष्टिकोन किंवा मतांचे प्रतिनिधित्व करत नाही. पीएफआरडीए (PFRDA) पुस्तिकेतील माहितीबद्दल अचूकता, उपयुक्तता, योग्यता किंवा पूर्णतेच्या संदर्भात कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही अथवा हमी देत नाही.

पहिली आवृत्ती मे 2022. स्त्रोत नमूद केला असल्यास पुनर्निर्मितीस परवानगी आहे.

प्रकरण 01

सेवानिवृत्ती म्हणजे काय ते समजून घेणे

तुमचे डोळे बंद करा आणि तुम्ही यापुढे कमाई करत नसाल अशा वेळेची कल्पना करा.
तुला काय दिसते?

स्वतःला **आराम करताना, तुमचा वेळ शांतपणे घालवताना, तुमच्या मुलांना किंवा नातवंडांना भेट देताना** आणि **सुट्टी घालवताना तुम्हाला दिसेल?**

माझ्या मित्र-मैत्रिणींनो, तुमच्या आयुष्यातल्या ज्या टप्पावर तुम्ही काम करणे थांबवता आणि तुमच्या जमा झालेल्या बचतीवर जगता त्याला सेवानिवृत्ती म्हणतात.

हा एक टप्पा आहे ज्यासाठी तुम्ही पुरेसे बचत करणे आवश्यक असते, जेणेकरून तुम्ही कल्पना केलेले जीवन जगू शकता.

- घरखर्च भागवणे
- वैद्यकीय खर्च
- तुमच्या आणि तुमच्या कुटुंबाच्या गरजा
- मनोरंजन आणि सहली किंवा फिरायला जाणे

तुमच्या सेवानिवृत्तीनंतर देखील, तुम्हाला या सर्वांसाठी पुरेसा पैश्याची गरज असेल.

तुम्ही तुमच्या कामकाजी आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यावर **इएआरएन (EARN)** केले असल्यास तुमचे आर्थिक स्वातंत्र्य शक्य आहे - आर्थिक अडचणी आणि चिंतांपासून मुक्तता.

याचा अर्थ असा की, आता तुमची पाऊल उचलण्याची वेळ आली आहे **सेवानिवृत्तीच्या गरजांसाठी प्रारंभिक कृती** (EARN) करण्याची.

काय मग तयार आहात?

तुमच्या सेवानिवृत्तीचे नियोजन करणे

तुमच्या सेवानिवृत्तीचे नियोजन करणे म्हणजे तुम्ही तुमच्या आयुष्यभर तुमच्या गरजा पूर्ण करत राहू शकता हे सुनिश्चित करण्यासाठी पुरेशी बचत करणे. दुसऱ्या शब्दात, निवृत्तीनंतर आरामात जगण्यासाठी तुम्हाला किती पैसे लागतील याचा विचार करून त्यावर कृती करणे.

त्यासाठी, तुम्हाला तुमच्या पन्नाशीला पोहोचण्यासाठी किती काळ शिल्लक आहे याचा देखील विचार करावा लागेल.

त्यामुळे आजचे सरासरी आयुर्मान काय आहे असे तुम्हाला वाटते याचा अंदाज घेऊ या.

कोणी सांगू शकेल का? बरं, वस्तुस्थिती अशी आहे की तुमच्यापैकी बहुतेकजण सेवानिवृत्त झाल्यानंतर बरेच वर्षे जगतील, आरोग्यसेवांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे सरासरी आयुर्मान वाढले आहे.

भारतात, आज साधारणतः लोक 60 व्या वर्षी सेवानिवृत्त झाल्यानंतर 20 वर्षांहून अधिक जगतात.



1990s - 2020s

त्यामुळे सेवानिवृत्तीनंतर तुमच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी तुम्हाला पुरेसा निधी आवश्यक असेल.

मात्र योग्य नियोजन न केल्यास, तुमच्याजवळ सेवानिवृत्तीचा पुरेसा निधी असू शकत नाही. याचा अर्थ, तुमच्या मासिक खर्चाचे व्यवस्थापन करण्यासाठी तुमच्याकडे पुरेसे पैसे नसतील. अशी परिस्थिती तुम्हाला पुन्हा नोकरी/ कमाई करण्यास भाग पाडू शकते. परंतु, **तुम्ही आत्ताच योग्य ते नियोजन केल्यास, नंतर पैसे संपण्याची शक्यता कमी असेल.**

त्यामुळे आजच तुमच्या सेवानिवृत्तीसाठी योग्य नियोजन करा आणि तुमचे उद्याचे स्वातंत्र्य (अर्न करा) कमवा!

प्रत्येकासाठी पेन्शन

तर मित्र-मैत्रिणींनो, तुम्हाला माहित आहे का, सेवानिवृत्ती नियोजनात तुमची सर्वोत्तम प्रतिज्ञा कोणती असेल? तुम्हाला वाटले त्यापेक्षा उत्तर खूप सोपे आहे. हा एक शब्द आहे - पेन्शन. होय, सेवानिवृत्तीनंतर पेन्शनवरच तुमचा चरितार्थ चालेल.

सेवानिवृत्तीनंतर, तुम्ही आरामात बसू करू शकता कारण तुमच्याकडे आरामदायी जीवन उपभोगण्यासाठी पुरेसा निधी असेल.

पेन्शनमुळे, तुम्हाला मिळते हमी, निश्चित मासिक रक्कम मिळण्याची

तुम्हाला पेन्शन मिळेल, तुम्ही काम करणार नसलेल्या वर्षांसाठी बाजूला ठेवलेल्या पैशातून

सेवानिवृत्तीनंतर पेन्शन तुम्हाला तुमच्या गरजा आणि स्वप्न पूर्ण करण्याची संधी देते

पण पेन्शन फक्त सरकारी कर्मचाऱ्यांसाठीच आहे असे तुम्हाला वाटते का? किंवा तुमच्या सारख्या खाजगी कंपन्यांमध्ये नोकरी करणाऱ्या तुमच्या समवयस्कांसाठीदेखील? असा विचार करणे चूक ठरेल.

माझ्या प्रिय मित्रमैत्रिणींनो, प्रत्येकाला पेन्शन मिळू शकते - अगदी तुम्हालादेखील.

वय कमी असतांना सुरुवात करा, अधिक बचत करा

तुम्ही तुमच्या सेवानिवृत्तीसाठी कधीपासून नियोजन सुरू करावे, असा तुमचा विचार आहे? लगेच.
होय, तुम्ही ते बरोबर ऐकले.

तुम्ही जितक्या लवकर सुरुवात कराल तितकी अधिक पुंजी सेवानिवृत्तीसाठी तुमच्या पन्नाशीतच तुमच्याकडे असेल (मन:शांतीचा विचार करा).

तुम्ही तुमच्या सेवानिवृत्तीचे नियोजन 18 ते 70 वर्षां दरम्यान कोणत्याही वयात करू शकता.

मी तुम्हाला एक उदाहरण देतो.

तुमचे सध्याचे वय = 25 वर्षे
मासिक खर्चाचे मूल्य = ₹ 10,000
तुमचे सेवानिवृत्तीचे वय = 60 वर्षे
तुम्हाला तुमच्या कितव्या वर्षापर्यंत नियोजन करायचे आहे = 80 वर्षे

गृहीतके

महागाई = 5%
पेन्शनसाठी गुंतवणुकलेल्या रक्कमेवर मिळणारे रिटर्न = 10%



मी वेगवेगळ्या वयोगटांसाठी मांडलेली काही परिस्थिती खाली दर्शवल्या आहेत. तुम्हाला लागणाऱ्या मासिक खर्चाचे चलनवाढ-समायोजित मूल्य, मासिक गुंतवण्याची आवश्यक रक्कम आणि 60 वर्षांनी आवश्यक सेवानिवृत्ती संपत्ती हे सर्व दर्शवले आहेत.

वय	25 (सेवानिवृत्त होण्यासाठी 35 वर्ष बाकी)	30 (सेवानिवृत्त होण्यासाठी 30 वर्ष बाकी)	45 (सेवानिवृत्त होण्यासाठी 15 वर्ष बाकी)
60व्या वर्षी लागणारे खर्चाचे मूल्य	55,160	43,219	20,789
दरमहा गुंतवणुकीची रक्कम	2,236	2,942	7,720
60व्या वर्षी आवश्यक संचित रक्कम	85 लाख	67 लाख	32 लाख

कमी वय असतांना सुरुवात करा आणि अनेक वर्ष तुमच्या पेन्शनसाठी बचत करा.

अशा प्रकारे, तुम्ही उतारवयात आरामशीर जगू शकाल - तुम्ही लवकर सेवानिवृत्त होण्याचा निर्णय घेतला तरीही तुम्हाला फारसे त्रासदायक होणार नाही.

मनीराम मंत्र

- **सेवानिवृत्तीच्या गरजांसाठी प्रारंभिक** कृती करा आणि आर्थिक अडचणींपासून तुमचे स्वातंत्र्य मिळवा.
- तुम्ही सरकारी किंवा खाजगी कंपनीचे कर्मचारी नसले तरीही **तुम्हाला पेन्शन मिळू शकते**.
- वय कमी **असतांनाच बचत करणे सुरु करा** जेणेकरून तुम्हाला तुमची सेवानिवृत्ती संपत्ती जमा करण्यासाठी आणि चक्रवाढ दराने वाढ होणाऱ्या तुमच्या संपत्तीचा आनंद घेण्यासाठी बरीच वर्षे मिळतील. असे केल्याने, तुम्ही तुमचे सेवानिवृत्त जीवन आरामात जगाल.

तुमचे एनपीएस(NPS) अकाऊंट ऑनलाईन उघडा www.npstrust.org.in/content/open-your-nps-account-online

प्रकरण 02

लक्षात ठेवण्याचे घटक

सेवानिवृत्तीच्या नियोजनासाठी तुम्ही काही महत्त्वाचे घटक विचारात घेतले पाहिजेत उदाहरणार्थ

- **तुम्हाला कधी सेवानिवृत्त व्हायचे आहे?**
- **सेवानिवृत्तीनंतर तुम्हाला किती पैसे लागू शकतात?**
- **तुम्हाला लवकर सेवानिवृत्त होणे परवडेल का?**
- **तुम्ही काम करणे थांबवाल तेव्हा तुमच्या उत्पन्नाचा स्थिर स्रोत कसा सुनिश्चित कराल?**

मला सविस्तर सांगण्याची संधी द्या.

1. पहिल्या मुद्द्याविषयी – **तुम्ही कधी सेवानिवृत्त होऊ इच्छिता?**

   तुम्ही आणखी 10 वर्षे काम करू इच्छिता? की, 20 वर्षे? की, 30 वर्षे? किंवा कदाचित त्याही पेक्षा अधिक काळ? लक्षात घ्या, एक व्यक्ती 80 वर्षांहून अधिक जगणे अपेक्षित आहे; त्यामुळे तुम्ही जितक्या लवकर सेवानिवृत्त व्हाल तितका जास्त काळ तुम्हाला पेन्शनची गरज भासेल.

2. दुसरा मुद्दा आहे – **सेवानिवृत्तीनंतर तुम्हाला दरमहा किती पैश्याची आवश्यकता भासेल?**

   - हे तुम्हाला लागणारे अन्न, कपडे आणि औषधं यासारख्या दैनंदिन खर्चावर आधारित असेल. सध्या असलेल्या काही खर्चाचे स्वरूप बदलू शकते. उदाहरणार्थ, पुढे शाळेची फी लागणार नाही मात्र वैद्यकीय खर्च वाढू शकतो.

   - विचारात घेण्याजोगा महत्त्वाचा विषय म्हणजे महागाई. हे मी एका साध्या उदाहरणाने हे स्पष्ट करतो. सांगा, आज तुम्ही 1 किलो तांदूळ ₹ 50 ला विकत घेत असाल. आजपासून 10 वर्षांत, 5% महागाईत वाढ अपेक्षित आहे, तुम्हाला 1 किलो तांदूळ विकत घ्यायला ₹75 मोजावे लागतील. तुम्ही तुमच्या सेवानिवृत्तीच्या नियोजनात महागाईचा विचार केला नाही तर पेन्शनसह खर्च करतांना किती कमतरता भासेल याची कल्पना करा.

आज तुम्ही 30 वर्षांचे असाल तर तुमच्या सेवानिवृत्तीच्या वेळी हे कॅल्क्युलेशन कसे दिसेल.

वआजचे वय = 30 वर्षेल

सध्या होणार खर्च = ₹ 10,000 दरमहा

60 व्या वर्षी सेवानिवृत्ती आणि 80 पर्यंत नियोजन

महागाई = 5%

सेवानिवृत्तीच्या वेळी गृहीत धरलेले महागाई खर्चाचे मूल्य = ₹ 43,000 दरमहा

महागाईचा विचार न करता गुंतवणूक केल्यास खर्चासाठी आवश्यक रकमेची मासिक कमतरता = ₹ 33,000

सेवानिवृत्तीचे नियोजन करताना महागाईचा विचार किती गांभीर्याने केला पाहिजे हे तुम्ही स्पष्टपणे पाहू शकता.

3. **तुम्हाला लवकर सेवानिवृत्त होणे परवडेल किंवा नाही** याचे उत्तर देण्यासाठी, तुम्हाला सेवानिवृत्त झाल्यावर तुम्हाला किती रक्कम आवश्यक असेल याचा विचार करावा लागेल.

याच उदाहरणाचा पुढे विचार केल्यास.

तुम्ही आज 30 वर्षांचे आहात

तुमचे सध्याचा दरमहा खर्च ₹ 10,000

गृहीत धरलेली महागाई 5%

तुम्ही गुंतवणुकलेल्या रक्कमेवर मिळणारे रिटर्न आहे द.सा.द.शे. 10%

तुमची बचत किमान तुम्ही 80 वर्षांची होईपर्यंत पुरावी अशी तुमची इच्छा आहे

तुम्ही 60 वर्षांपर्यंत काम करत राहिल्यास, तुम्हाला दरमहा ₹ 2,942 काँट्रीब्युट करावे लागतील

परंतु जर तुम्ही 50व्या वर्षी सेवानिवृत्त होऊ इच्छित असल्यास तुम्हाला खूप जास्त बचत करणे आवश्यक आहे - म्हणजेच ₹ 6,660 प्रति महिना.

4. तुमच्या सेवानिवृत्तीनंतर उत्पन्नाचा स्थिर आणि पुरेसा स्रोत सुनिश्चित करण्यासाठी, **तुम्ही गुंतवत असलेल्या पेन्शनच्या रक्कमेवर मिळणाऱ्या रिटर्नचा** विचार करण्याची गरज आहे.

तुम्हाला महागाईवर तुम्हाला मिळणाऱ्या रिटर्न्सने मात करावी असे वाटत असल्यास तुम्ही तुमची गुंतवणूक अतिशय विचारपूर्वक निवडणे आवश्यक आहे. विविध गुंतवणूक पर्यायांशी संबंधित रिस्क आणि रिटर्न्स समजून घ्यावेत.

समजा, तुम्ही दरमहा ₹ 500 ची गुंतवणूक करत असाल. प्रत्येक प्रकारच्या गुंतवणुकीच्या बाबतीत 30 वर्षांच्या शेवटी तुमच्या पेन्शनच्या गुंतवणुकीवर मिळणारे अंदाजे रिटर्न वेगवेगळे असतील.

बँक मुदत ठेवी(फिक्सड डिपॉझिट) सारख्या निश्चित रिटर्न देणाऱ्या गुंतवणुकी सुरक्षित असतात परंतु बाजाराशी निगडीत गुंतवणुकीपेक्षा कमी रिटर्न्स देतात.

तुम्ही फक्त द.सा.द.शे. 6% दराने फिक्स रिटर्नमध्ये गुंतवणूक केल्यास तुम्हाला ₹ 5,00,000 मिळतील. इक्विटीमध्ये द.सा.द.शे. 12% गुंतवणुकीसह, तुमच्याकडे ₹ 17,47,482 सेवानिवृत्ती निधी जमा होईल.

तुम्हाला आता सेवानिवृत्तीच्या नियोजनावर परिणाम करणारे घटक समजले आहेत, परंतु त्याची अंमलबजावणी तुम्ही प्रत्यक्षात कशी कराल? अधिक माहितीसाठी पुढे वाचा.

सेवानिवृत्तीसाठी तुमची योजना तयार करा

ठीक आहे, चला तर मग, तुमच्या सेवानिवृत्तीसाठी तुमची योजना तयार करूया. हे करण्याचे दोन मार्ग आहेत.

1. आधी, **तुम्हाला तुमच्या सेवानिवृत्तीसाठी किती रक्कम जमा करायची आहे हे शोधून काढणे आवश्यक आहे.** ते कसे करावे याबद्दल विचार करत आहात? थांबा, जास्त विचार करू नका, रिटायरमेंट कॅल्क्युलेटर कसा दिसतो ते खाली दिले आहे.

- तुम्हाला हवी असलेली मासिक पेन्शनची रक्कम तुम्ही ठरवू शकता
- कॅल्क्युलेटर तुम्हाला तुमच्या पेन्शनच्या रकमेच्या आधारावर किती काँट्रिब्यूट करावे याची माहिती देते
- **www.npstrust.org.in/content/pension-calculator** या लिंकवर तुम्ही रिटायरमेंट कॅल्क्युलेटर बघू शकता.

हे टेबलवरून तुम्ही **तुमच्या वयानुसार दरमहा किती रक्कम वाचवली** पाहिजे ते समजते जेणेकरून तुम्ही सेवानिवृत्त होईपर्यंत तुमच्याकडे बरीच मोठी पुंजी जमा झालेली असेल.



2. नंतर, तुम्हाला **तुमच्या सद्यस्थितीचा अंदाज घ्यावा लागेल.**

- तुम्ही सध्या कमवत असलेल्या पैशातून तुमचे सध्याचे वय आणि गरजा लक्षात घेता किती बचत करू शकता याचा विचार करा
- बचत सुरू करा. रक्कम कमी असली तरी काळजी करू नका. जेव्हा तुमच्याकडे जास्त पैसे येतील तेव्हा आणखी बचत करा
- तुम्ही आता कितपत रिस्क घेऊ शकता याचा अंदाज घ्या. तुम्ही अगदी कमी मोबदल्यासाठी सुरक्षित गुंतवणूक निवडू शकता किंवा अधिक मोबदल्यासाठी रिस्क असलेली गुंतवणूक करू शकता

3. **शेवटी, वेगवेगळ्या पेन्शन योजनांबद्दल माहिती घ्या.**

- योजनेत पेन्शनची तरतूद आहे का हे पहा (एनपीएस/NPS, विमा आणि इतर योजना)
- योजनेत पेन्शनची हमी मिळेल का ते बघा
- तुमची पेन्शन योजना कोणत्या मालमत्ता वर्गात गुंतवणूक करते ते शोधा

उपलब्ध असलेल्या विविध योजनांचे पुनरावलोकन केल्यानंतर आणि त्यात समाविष्ट असलेले आर्थिक फायदे आणि रिस्क समजून घेतल्यानंतर तुम्ही तुमचा निर्णय घ्या. तुम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी मी नेहमीच तत्पर असेन. मी तुमचा पीएफआरडीए (PFRDA) मदतनीस असून 1800110708 आणि 1800110069 या कॉल सेंटर नंबर्स वर उपलब्ध असेन. तसेच तुम्ही एनपीएस (NPS) आणि एपीवाय(APY) संबंधित प्रश्नांसाठी अनुक्रमे 1800222080 आणि 18008891030 वर आमच्याशी संपर्क साधू शकता.

मनीराम मंत्र

तुमचा अंदाजे खर्च आणि सध्याचे वय यावर आधारित तुम्ही किती बचत करू शकता हे समजून घेऊन तुमची **सेवानिवृत्ती योजना** निवडा.

पेन्शन गुंतवणुकीसाठी **तुमच्याकडे असलेले विकल्प** शोधा.

उपलब्ध असलेल्या विविध पर्यायांमधील **रिस्क** आणि रिटर्न **समजून घ्या.**

प्रकरण 03

पेन्शन मिळवून देणाऱ्या विविध पर्यायांचे वैशिष्ट्ये: मुख्य विचार

पेन्शनचे नियोजन करताना महागाईचे महत्त्व आता तुम्हाला समजले असेल. महागाईवर मात करण्यासाठी तुमचा पैसा अधिक वेगाने वाढला पाहिजे.

सध्या बाजारात अनेक पर्याय उपलब्ध असल्याने, कोणता पर्याय तुमच्यासाठी सर्वोत्तम आहे हे ठरवण्यासाठी संघर्ष होऊ शकतो. तुम्हाला हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी, मी मूलभूत गोष्टींबद्दल सांगू इच्छितो– मी फायनान्शिअल (आर्थिक) रिटर्न्सबद्दल नंतर बोलेन.

1. प्रथम, **तुम्ही निवडलेला गुंतवणूकीचा पर्याय कितपत योग्य आहे ते ओळखा.**
   - नियमावली हे सुनिश्चित करते की तुमचे पैसे जबाबदारीने गुंतवले जातील
   - तुमची गुंतवणूक नियामकाने जारी केलेल्या उत्पादन मार्गदर्शक तत्त्वांनुसार हाताळली जाते

2. दुसरे, **तुमची पेन्शन योजना व्यवस्थापित करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा हिशेब करा.**
   - जास्त खर्च म्हणजे कमी रिटर्न्स - हे लक्षात ठेवा.
   - खर्च तुमच्या गुंतवणुकीच्या रिटर्न्सवर परिणाम करतात, म्हणून प्रयत्न करा आणि कमी खर्च असलेला गुंतवणूक पर्याय निवडा

3. तिसरे, **पेन्शन योजनेची पारदर्शकता तपासा.** पेन्शन योजनासाठी तुम्हाला नेमके किती शुल्क लागेल आणि पेन्शनचे कॉंट्रिब्युशन कसे गुंतवले जाते हे स्पष्ट करत असल्यास, निर्णय घेणे सोपे होईल

4. चौथे, **पेन्शन योजना योग्य सेवा पुरवते आणि गाऱ्हाणे /तक्रारींचे निराकरण करते** का ते शोधा.

- तुमच्या तक्रारींकडे लक्ष देण्याची एक पद्धत आहे — आणि ती लवकर आणि निर्णायकपणे केली जाते
- त्यांच्याकडे एक सोयीस्कर कम्युनिकेशन चॅनेल असणे आवश्यक आहे जिथे तुम्हाला आवश्यक असेल तेव्हा शंका निरसन करण्यासाठी कोणीतरी उपलब्ध असेल

5. पुढे, सुरुवातीपासून आणि गेल्या पाच ते सात वर्षांपर्यंतचा **सदर योजनेचा परफॉर्मन्स कसा आहे** ते जाणून घ्या.

- रिटर्नमध्ये सातत्यता असणे आवश्यक आहे
- रिटर्न एका वर्षी कमी तर पुढच्या वर्षी जास्त नसावा

6. आणि शेवटी, **पेन्शन योजना ऑनलाईन सेवा पुरवते** का याची चौकशी करा

मला तुम्हाला ऑनलाईन सेवांचे महत्त्व सांगण्याची गरज नाही. तुम्हाला माहिती आहे की आज तुमचे जीवन ऑनलाईन झालेल्या गोष्टींमुळे किती सोपे आहे.

तुम्ही या सर्व महत्त्वाच्या घटकांचा विचार केल्यानंतर, योग्य पेन्शन गुंतवणूक निवडण्याचे काम सोपे होते.

सेवानिवृत्तीसाठी गुंतवणूक पर्याय

गुंतवणुकीचा योग्य पर्याय निवडण्यासाठी खूप विचार आणि नियोजन करावे लागते. आणि, खूप गोंधळ देखील होऊ शकतो. म्हणूनच मला एक संधी द्या.

तुम्ही नॅशनल पेन्शन सिस्टीम (NPS), अटल पेन्शन योजना (APY), पब्लिक प्रॉव्हिडंट फंड (PPF), म्युच्युअल फंड आणि विमा कंपन्या आणि म्युच्युअल फंडांकडील पेन्शन योजनांमधून निवड करू शकता. तुम्हाला समजण्यासाठी मी प्रत्येकाच्या पद्धती खाली सूचीबद्ध केल्या आहेत.तुमच्यासाठी जे सर्वोत्तम असेल त्याची तुम्ही निवड करावी.

या योजनांच्या काही ठळक वैशिष्ट्यांवर एक नजर टाका.

	नॅशनल पेन्शन सिस्टीम (NPS)	अटल पेन्शन योजना (APY)	पब्लिक प्रॉव्हिडंट फंड (PPF)	म्युच्युअल फंड	विमा कंपन्यांकडून पेन्शन योजना
ते कुठे गुंतवते (इन्व्हेस्ट करते)	इक्विटी/बाँड्स	इक्विटी/बाँड्स	बाँड्स आणि इतर	इक्विटी/बाँड्स	इक्विटी/बाँड्स
निश्चित रिटर्न	नाही	पेन्शनच्या रक्कमेची हमी असते	होय	नाही	नाही
गुंतवणुकीसाठी खर्च	0.26-0.3%	माहिती उपलब्ध नाही	काही नाही	1-2%	>5%
फायदे	1. सुटसुटीतपणा 2. कमी खर्च 3. कलम 80C अंतर्गत केलेल्या कॉंट्रिब्युशनवर आणि कलम 80CCD (1B) अंतर्गत विशेष ₹ 50,000 वर आयकरात सवलत मिळू शकते 4. एकरकमी + नियमित पेन्शन 5. अटींच्या अधीन राहून पैसे काढण्याची सुविधा मिळू शकते 6. मुदतपूर्व बंद करता येते 7. पैसे काढणे करमुक्त आहे 8. तुम्ही वार्षिकी खरेदी करता तेव्हा GST लागत नाही	1. अटींच्या अधीन मुदतपूर्व बंद करता येते 2. कॉंट्रिब्युशनवर आधारित पेन्शनची निश्चित रक्कम ठरते 3. कलम 80CCD (1B) अंतर्गत कॉंट्रिब्युशनवर आयकरात सवलत मिळू शकते	1. स्वरूप सहज बदलता येते 2. फक्त एकरकमी लाभ 3. निश्चित रिटर्न 4. कलम 80C अंतर्गत आयकरात सवलत मिळू शकते 5. अटींच्या अधीन मुदतपूर्व बंद करता येते	1. कोणताही लॉक-इन कालावधी नाही; एक्झिट चार्जेस लावले 2. निवडण्यासाठी योजनांची विविधता 3. कलम 80C अंतर्गत आयकरात सवलत मिळू शकते	1. लाईफ कव्हर उपलब्ध 2. कलम 80C अंतर्गत आयकरात सवलत मिळू शकते
तोटे	1. 5 वर्षांचा किमान लॉक-इन कालावधी; एक्झिट शुल्कासह/ 5 वर्षांची कालमर्यादा; बाहेर पडण्यासाठी शुल्क आकारले जाईल	1. आयकरात सवलत नाही	1. 5 वर्षांचा किमान लॉक-इन कालावधी; एक्झिट शुल्कासह / 5 वर्षांची कालमर्यादा; बाहेर पडण्यासाठी शुल्क आकारले जाईल 2. कमाल गुंतवणूक रक्कम आणि रिटर्न्सवर मर्यादा	1. गोंधळात टाकणारे-निवडण्यासाठी बरेच फंड 2. फंडावर लक्ष ठेवावे लागते	खूप जास्त किंमत, त्यामुळे गुंतवणूकदारांचे रिटर्न कमी होतात

पेन्शनचा फायदा

तुम्ही सेवानिवृत्त झाल्यावर, तुम्ही कदाचित एक मोठा निधी जमा झालेला असेल (हे कदाचित मोठ्या रकमेसारखे वाटेल) परंतु तरीही तुम्ही द्विधा मनःस्थितीत असू शकाल. तुम्ही ते एकरकमी म्हणून ठेवावे किंवा ते तुमच्या पगारासारख्या नियमित ठराविक रक्कम देणाऱ्या पर्यायात रूपांतरित करावे?

एकरकमी तुम्हाला तुमचे कर्ज फेडण्यास, तुमच्या कुटुंबावर खर्च करण्यास किंवा सुट्टीवर जाण्यास मदत करेल. मात्र, अनेक जागतिक अभ्यासातून असे दिसून आले आहे की एकरकमी 'रिटायरमेंट पॉट/सेवानिवृत्ती निधी' लवकर संपू शकतो, काहीवेळा सेवानिवृत्तीपासून फक्त पाच वर्षांपर्यंत. लक्षात ठेवा, 60 नंतर 20 वर्षांपेक्षा जास्त जगणे अपेक्षित आहे.

दुसरीकडे, नियमित सेवानिवृत्तीचे उत्पन्न अधिक अंदाज करण्यायोग्य असते आणि मासिक अंदाजपत्रक अधिक सहजपणे व्यवस्थापित करण्यात मदत करते आणि नोकरीदरम्यान मिळणाऱ्या नियमित पगारासारखेच काम करते.

एकरकमी पेमेंट साठी पेन्शनचे फायदे समजून घेण्यासाठी खालील तुलना पहा.

पेन्शन/वार्षिकी (ॲन्युटी)	एकरकमी पेमेंट
नियमित रक्कमेची हमी	नियमित रक्कम मिळत नाहीत
आर्थिक सुरक्षिततेची चांगली जाणीव देते	पैसे काढण्यात अधिक लवचिकता देते परंतु तुमच्याकडे मोठी जबाबदारी असणे आवश्यक आहे
खर्च व्यवस्थापित करण्याची अधिक शक्यता आहे	जास्त खर्च होण्याची शक्यता आहे
तुम्हाला तुमच्या आयुष्यभर पेमेंटची मिळण्याची हमी देते	तुमच्या लक्षात येण्याआधीच पैसे संपण्याची अधिक शक्यता आहे
तुमच्या सेवानिवृत्तीच्या काळातही बचतीचे नियोजन करण्यात मदत करू शकते	शाश्वत उत्पन्न मिळवण्यास सक्षम आहे याची खात्री करण्यासाठी बरेच तपशीलवार आर्थिक ज्ञान आणि सतत देखरेख ठेवणे आवश्यक आहे

तर मग, पुढे काय?

आपण अनेक प्रकारच्या योजनांवर चर्चा केली आहे, मात्र, तुम्हाला दोन अधिक तपशील समजून घेणे आवश्यक आहे - म्हणजे, नॅशनल पेन्शन सिस्टीम आणि अटल पेन्शन योजना. हे, बहुसंख्य लोकांच्या अपेक्षा पूर्ण करतील, याची मला खात्री आहे.
परंतु तुम्ही एनपीएस(NPS) आणि एपीवाय(APY) वरील पुढील प्रकरणाकडे जाण्यापूर्वी, मी काही सावधगिरीच्या उपायांवर प्रकाश टाकू इच्छितो जे तुम्हा सर्वांनी आजपासूनच घेतले पाहिजेत.

नियमित पेन्शन मिळवण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी आधीपासूनच नियोजन करा

- तुमच्या खर्चावर लक्ष ठेवा
- उपभोग, दिखावा आणि खर्चासाठी कर्ज घेणे टाळा
- तुमची आर्थिक कागदपत्रे व्यवस्थित ठेवा
- नामनिर्देशित व्यक्तीचे तपशील नेहमी अपडेट करा

घोटाळ्यांपासून सावध रहा

- कोणतीही आर्थिक माहिती अनोळखी व्यक्तींसोबत शेअर करू नका
- तुमचे डेबिट कार्ड आणि त्याचे तपशील इतरांना देऊ नका
- डिजिटल ट्रँजॅक्शनबाबत अधिक सावधगिरी बाळगा
- अनोळखी व्यक्तीकडून तुमच्या अकाऊंटमध्ये पैसे मिळण्यास सहमती दर्शवू नका
- तुमच्या फोन/कॉम्प्युटरचा ॲक्सेस कोणालाही देऊ नका
- केवायसी (KYC) मेसेजेस पासून सावध रहा - फक्त तुमच्या बँक/वित्तीय संस्थेच्या शाखेशी थेट किंवा त्यांच्या वेबसाईटवर व्यवहार करा

मनीराम मंत्र

गुंतवणुकीपूर्वी विचारात घेतले जाणारे महत्त्वाचे घटक - **खर्च, पारदर्शकता, नियम आणि सेवा पातळी.**

पेन्शन एकरकमी पेमेंटच्या तुलनेत नियमित रक्कम ऑफर करतात.

नॅशनल पेन्शन सिस्टीम आणि **अटल पेन्शन योजना** बहुसंख्य लोकांच्या अपेक्षा पूर्ण करतील.

प्रकरण 04

नॅशनल पेन्शन सिस्टीमची जादू

ठीक आहे, मित्र-मैत्रिणींनो, पेन्शन नियोजनाच्या बाबतीत तुम्ही आमच्या सुपरस्टारसाठी तयार आहात का?

तुमच्यासाठी सादर करत आहे, नॅशनल पेन्शन सिस्टीम (एनपीएस /NPS).

एनपीएस (NPS) ही एक अशी योजना आहे जी तुम्हाला वैयक्तिक पेन्शन अकाऊंटमध्ये पैसे जमा करण्याची मुभा देते. तुम्ही तुमच्या नोकरीच्या संपूर्ण कालावधीदरम्यान या अकाऊंटमध्ये पैसे जमा करू शकता आणि सेवानिवृत्तीनंतर त्याचा उपभोग घेऊ शकता.

एवढेच नाही! एनपीएस(NPS)मुळे तुम्हाला वर्षभरात कधीही गुंतवणूक करण्याची लवचिकता मिळते. यामुळे तुम्हाला आयकरात सवलत मिळते आणि हाच नियम यातून पैसे काढतांनादेखील लागू होतो

या अप्रतिम पेन्शन योजनेचे फायदे सविस्तरपणे जाणून घेऊ या.

सुलभता
एका सुलभ प्रक्रियेद्वारे एनपीएस (NPS) अकाऊंट उघडा आणि तुमचा परमनंट रिटायरमेंट अकाऊंट नंबर (पीआरएएन /PRAN) मिळवा.

कॉंट्रिब्युशन करण्यात लवचिकता
एनपीएस (NPS) तुम्हाला वर्षभरात कधीही आणि कितीही रक्कम कॉंट्रिब्युट करण्याचे स्वातंत्र्य देते (प्रत्येक वेळी किमान ₹500 कॉंट्रिब्युट; दरवर्षी एकूण कॉंट्रिब्युशन ₹1000 आणि त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे).

गुंतवणुकीचे स्वातंत्र्य
एनपीएस(NPS) तुम्हाला पेन्शन गुंतवणुकीच्या विविध पर्यायांमधून निवड करण्याची मुभा मिळते, ज्यामुळे तुम्ही तुमच्या सेवानिवृत्तीचे नियोजन तुम्हाला हवे तसे करू शकता. अधिक माहितीसाठी या प्रकरणातील “एनपीएस(NPS) अंतर्गत गुंतवणूक पर्याय” (“इन्व्हेस्टमेंट ऑप्शन अंडर NPS”) विभाग पहा.

सुटसुटीतपणा
तुम्ही एकदा एनपीएस(NPS) अकाऊंट उघडले की ते तुम्ही कायमस्वरूप वापरू शकता — तुम्ही तुमचे शहर किंवा नोकरी बदलली तरीही काहीही बदल होत नाही.

कमी खर्च
एनपीएस(NPS) ही भारतातील सर्वात कमी खर्च असलेली पेन्शन योजना आहे. हे तुम्हाला दीर्घकालीन बचत आणि गुंतवणुकीद्वारे तुमचा सेवानिवृत्ती निधी वाढवण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला महागाईवर मात करण्याजोगे रिटर्न्स मिळतात.

वापरण्यास सोपे
तुमचे एनपीएस (NPS) खाते इ-एनपीएस (e-NPS) किंवा कोणत्याही पीओपी (PoPs) द्वारे सुरू केले जाऊ शकते तसेच प्लॅटफॉर्म वापरून तुमच्या अकाऊंटमध्ये ऑनलाईन कॉंट्रिब्युशन देखील करता येते.

आयकरात सवलत
तुमच्या कॉंट्रिब्युशनवर आयकरात सवलत मिळते. अधिक माहितीसाठी "टॅक्सेशन अंडर NPS" "एनपीएस/(NPS) अंतर्गत आयकर" विभाग बघा.

शाश्वतता
तुम्ही तुमच्या नियमित उत्पन्नाबद्दल काळजी करणे थांबवू शकता कारण एनपीएस(NPS) मुळे तुम्हाला नियमित पेन्शन मिळण्याची हमी मिळते (तुम्ही निवडलेल्या पेन्शनच्या प्रकारानुसार ते स्थिर किंवा अस्थिर असू शकते).

व्यवस्थित नियमन केलेले
एनपीएस(NPS) पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी (पीएफआरडीए / PFRDA) द्वारे नियंत्रित केले जाते ज्यामुळे पारदर्शक पेन्शन गुंतवणुकीचे नियम, नियमित देखरेख आणि एनपीएस(NPS) ट्रस्टद्वारे व्यवस्थापन केलेल्या फंडाच्या परफॉर्मन्सचे पुनरावलोकन करते.

एनपीएस(NPS) अंतर्गत गुंतवणुकीचे पर्याय

एनपीएस(NPS) अंतर्गत उपलब्ध असलेले गुंतवणुकीचे सर्व पर्याय लक्षात घेऊया. तुम्ही ॲक्टिव्ह चॉईस (सक्रिय निवड), ऑटो चॉईस (स्वयं निवड) किंवा इतर पर्याय निवडू शकता.

ॲक्टिव्ह चॉईस (सक्रिय निवड) म्हणजे काय?

तुम्हाला गुंतवणूक बाजार चांगल्या प्रकारे समजत असेल तर तुम्हाला हा पर्याय आवडेल. नावाप्रमाणेच हा पर्याय तुम्हाला इक्विटी (E), कॉर्पोरेट डेट (C), सरकारी सिक्युरिटीज (G) आणि पर्यायी मालमत्ता (A) या मालमत्ता वर्गात तुमचे काँट्रिब्युशन कसे गुंतवायचे याबद्दल सक्रियपणे निर्णय घेण्याची मुभा देतो.

ऑटो चॉईस (स्वयं निवड) म्हणजे काय?

जर तुम्हाला सोपे व्यवहार अपेक्षित असतील आणि तुमचा फंड मॅनेजर तुमची गुंतवणूक व्यवस्थापित करू इच्छित असेल तर तुमच्यासाठी ऑटो चॉईस (सक्रिय निवड) हा पर्याय आहे. हा पर्याय तुमचे वय लक्षात घेऊन तुमच्या एकूण गुंतवणुकीचे वेगवेगळ्या मालमत्ता वर्गांमध्ये वाटप करतो. आक्रमक (ॲग्रेसिव्ह), माफक (मॉडरेट) आणि स्थितीरक्षक (काँझर्व्हेटिव्ह) हे ऑटो चॉईस (सक्रिय निवड)मध्ये उपलब्ध असलेले तीन मालमत्ता वर्ग आहेत.

योजनेतील बदल आणि पेन्शन फंड मॅनेजर

ग्राहक एका आर्थिक वर्षात चार वेळा ऑटो (स्वयं) आणि ॲक्टिव्ह (सक्रिय) योजनांमध्ये बदल करू शकतो. पेन्शन फंड मॅनेजर देखील वर्षातून एकदा बदलले जाऊ शकतात.

या मालमत्ता वर्गांची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे.

ॲग्रेसिव्ह लाईफ सायकल फंड

हा फंड तुमची इक्विटी गुंतवणूक तुमच्या एकूण मालमत्तेच्या 75% पर्यंत मर्यादित करतो. जसजसे तुमचे वय वाढत जाईल तसतसे इक्विटी गुंतवणुकीतील तुमचे एक्सपोजर(प्रभावन) हळूहळू कमी होत जाते.
आक्रमक जीवन चक्र निधी / ॲग्रेसिव्ह लाईफ सायकल फंड अंतर्गत तुमच्या वयानुसार तीन मालमत्ता वर्गा (ॲसेट क्लास) मध्ये तुमचे काँट्रिब्युशन कसे वाटप केले जाईल ते बघा.

वय (वर्षे)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास ई (E)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास सी (C)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास जी (G)
35 वर्षांपर्यंत	75	10	15
36	71	11	18
37	67	12	21
38	63	13	24
39	59	14	27
40	55	15	30
41	51	16	33
42	47	17	36
43	43	18	39
44	39	19	42
45	35	20	45
46	32	20	48
47	29	20	51
48	26	20	54
49	23	20	57
50	20	20	60
51	19	18	63
52	18	16	66
53	17	14	69
54	16	12	72
55 वर्षे आणि त्याहून अधिक	15	10	75

माफक जीवन चक्र/ मॉडरेट लाईफ सायकल

या फंडमध्ये इक्विटी गुंतवणुकीतील एक्सपोजर(प्रभावन) वयाच्या 35 वर्षापर्यंत तुमच्या एकूण मालमत्ते(ॲसेट) पैकी 50% असेल आणि जसे तुमचे वय वाढेल तसे ते कमी होईल.

वय (वर्षे)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास ई (E)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास सी (C)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास जी (G)
35 वर्षांपर्यंत	50	30	20
36	48	29	23
37	46	28	26
38	44	27	29
39	42	26	32
40	40	25	35
41	38	24	38
42	36	23	41
43	34	22	44
44	32	21	47
45	30	20	50
46	28	19	53
47	26	18	56
48	24	17	59
49	22	16	62
50	20	15	65
51	18	14	68
52	16	13	71
53	14	12	74
54	12	11	77
55 वर्षे आणि त्याहून अधिक	10	10	8

एनपीएस(NPS)मधून पैसे काढल्यास अथवा योजनेतून माघार घेतल्यास कर आकारणी

योजनेतून मुदतपूर्व पैसे काढल्यास किंवा एक्झिट घेतल्यास किंवा मृत्यू झाल्यास "विथड्रॉल - एक्झिट" विभागात नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून तुम्ही आंशिक/ एकरकमी करमुक्त पैसे काढण्यासाठी पात्र आहात.

वार्षिकी/पेन्शन खरेदीवर एनपीएस(NPS) अंतर्गत कर आकारणी

- वार्षिकी खरेदीसाठी गुंतवलेली रक्कम करमुक्त असते
- इतर कोणत्याही उत्पन्नाप्रमाणे तुमच्या वैयक्तिक कर कोष्टकाला अनुसरून नियमित पेन्शन/वार्षिकी करपात्र असते

स्थितीरक्षक जीवन चक्र निधी / कॉंझर्व्हेटिव्ह लाईफ सायकल फंड

हा फंड तुमची 35 वर्षे पूर्ण होईपर्यंत इक्विटीमधील वाटप एकूण मालमत्ते(ॲसेट)च्या 25% पर्यंत मर्यादित करतो आणि जसे तुमचे वय वाढेल तसे ते कमी होते. या उदाहरणाद्वारे अधिक चांगले स्पष्ट होईल.

वय (वर्षे)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास ई (E)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास सी (C)	मालमत्ता वर्ग / ॲसेट क्लास जी (G)
35 वर्षांपर्यंत	25	45	30
36	24	43	33
37	23	41	36
38	22	39	39
39	21	37	42
40	20	35	45
41	19	33	48
42	18	31	51
43	17	29	54
44	16	27	57
45	15	25	60
46	14	23	63
47	13	21	66
48	12	19	69
49	11	17	72
50	10	15	75
51	9	13	78
52	8	11	81
53	7	9	84
54	6	7	87
55 वर्षे आणि त्याहून अधिक	5	5	9

आयकरात सवलत

एनपीएस(NPS) सामान्य नागरिक आणि कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांना कॉंट्रीब्युशन करतेवेळी, पैसे काढताना किंवा योजनेतून माघार घेताना विविध करलाभ देते. या लाभांचे पैलू खालीलप्रमाणे टिपता येतील.

एनपीएस(NPS)अंतर्गत कॉंट्रीब्युशन वरील कर - सामान्य नागरिकांसाठी असलेले कर लाभ

- तुम्ही कलम 80CCD (1A) अंतर्गत कलम 80CCE* मध्ये नमूद केलेल्या ₹ 1.5 लाख कमाल मर्यादेसह एनपीएस(NPS) कॉंट्रीब्युशनसाठी कर लाभ घेऊ शकता.
- एनपीएस(NPS) (Tier I अकाऊंट) मध्ये केलेल्या ₹ 50,000 पर्यंतच्या गुंतवणुकीसाठी अतिरिक्त कर सवलत कलम 80CCD (1B) अंतर्गत केवळ एनपीएस(NPS) सदस्यांसाठी उपलब्ध आहे.

*कलम 80C, कलम 80CCC आणि कलम 80CCD च्या उपकलम (1) अंतर्गत मिळणाऱ्या कर सवलतीची एकूण रक्कम कलम 80CCE नुसार कोणत्याही परिस्थितीत ₹ 1.5 लाखांपेक्षा जास्त नसावी.

कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांसाठी असलेले कर लाभ

कलम 80CCD(2) च्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्मचारी एकूण वेतनाच्या दहा टक्क्यांपर्यंत रक्कम अतिरिक्त कर लाभाच्या रुपात परत मिळवू शकतात. हे कलम 80CCD (1A) आणि 80CCD (1B) अंतर्गत नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा (सर्व गुंतवणूक योजनांसाठी एकूण मर्यादा ₹ 7.5 लाख) जास्त आहे.

एनपीएस(NPS) अकाऊंट कसे सुरू करावे?

तुमचे एनपीएस(NPS) अकाऊंट सुरू करायचे असेल तर ते दोन पद्धतींनी सुरू करता येईल.
तुम्ही तुमचे एनपीएस(NPS) अकाऊंट ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही मार्गांनी सुरू करू शकता.

ऑनलाईन

तुमचे एनपीएस(NPS) अकाऊंट इएनपीएस(eNPS) प्लॅटफॉर्म www.npstrust.org.in/content/open-your-nps-account-online वापरून ऑनलाईन उघडले जाऊ शकते. हे जलद आणि सोयीस्कर आहे. या खात्यात रक्कम जमा करण्यासाठी तुम्ही तुमचे बँक अकाऊंट, क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड यांचा वापर करू शकता.

ऑफलाईन

पीएफआरडीए (PFRDA) तुम्हाला मदत करण्यासाठी पॉइंट ऑफ प्रेझेन्स (पीओपी/POP) नावाचे केंद्र नियुक्त करते. एनपीएस(NPS) अकाऊंट उघडण्याचे फॉर्म पीओपीएस(POPs) मध्ये मिळतील जे संबंधित कागदपत्रांसह याच केंद्रामध्ये सबमिट करता येतात. तुम्ही पीओपी(POP) द्वारेही तुमच्या एनपीएस(NPS) अकाऊंटमध्ये कॉंट्रीब्युशन देऊ शकता. तुम्ही केंद्रीय, राज्य किंवा खाजगी कंपनीचे कर्मचारी असल्यास एनपीएस(NPS) नावनोंदणीसाठी तुमच्या एचआर (HR) विभागाशी संपर्क साधा. बहुतेक पीओपीएस(POPs) आता तुम्हाला ऑनलाईन पद्धतीने अकाऊंट उघडण्याचा पर्याय देतात.

पैसे काढणे / माघार घेणे

एनपीएस(NPS)च्या अनेक फायद्यांपैकी एक म्हणजे तो तुम्हाला वैयक्तिक गरजा पार पाडण्यासाठी तुम्ही निधी काढू शकता.

कसे ते पाहू

माघार घेणे

तुम्ही एनपीएस(NPS) मधून पूर्णपणे माघार घेऊ शकता आणि खालील परिस्थितीत तुमची सदस्यता रद्द करू शकता.

माघार घेणे (वयाचे 60 वर्ष पूर्ण होण्यापूर्वी/सेवानिवृत्तीच्या तारखेला)

मुदतपूर्व माघार घेण्याच्याबाबतीत, तुमच्या जमा झालेल्या निधीपैकी किमान 80% रक्कम नियमित पेन्शन देण्यासाठी ॲन्युटी (वार्षिकी) खरेदी करण्यासाठी वापरली जावी. उर्वरित 20% रक्कम एकरकमी म्हणून घेतली जाऊ शकते.

एनपीएस(NPS) अंतर्गत किमान 5 वर्षे पूर्ण झाल्यावरअकाऊंट उघडण्याची परवानगी आहे. जमा रक्कम ₹ 2.5 लाखांपेक्षा कमी असल्यास, ते सेवानिवृत्तीनंतर एकरकमी स्वरूपात दिली जाईल.

पुढे ढकलण्याचा / नंतर काढण्याचा पर्याय

मुदतपूर्व बाहेर पडण्याच्या बाबतीत, तुम्हाला तुमची पेन्शन पुढे ढकलण्याचा/ नंतर काढण्याचा किंवा एकरकमी पैसे काढण्याचा पर्याय मिळत नाही.

सेवानिवृत्तीनंतर

तुम्ही 60 वर्षांचे झाल्यानंतर, तुम्ही एकरकमी 60% पैसे काढण्याची निवड करू शकता आणि उर्वरित 40% (अनिवार्य वार्षिक) नियमित पेन्शनसाठी वापरू शकता.

माघार घेणे (18-60 दरम्यान सामील होणे)

वयाचे 60 वर्ष पूर्ण होण्याआधी किंवा सेवानिवृत्तीनंतर (5 वर्षे पूर्ण करण्याच्या अधीन)

- वार्षिकीकरण = किमान 80%
- एकरकमी पैसे काढणे = कमाल 20%
- कॉर्पस ₹ 2.5 लाख पेक्षा कमी असल्यास, संपूर्ण पैसे काढण्याची परवानगी असते

60 वर्षे पूर्ण झाल्यानंतर आणि 75 वर्षे वयापर्यंत

- वार्षिकीकरण = किमान 40%
- एकरकमी पैसे काढणे = कमाल 60%
- कॉर्पस ₹ 5 लाख पेक्षा कमी असल्यास, संपूर्ण पैसे काढण्याची परवानगी असते
- वयाच्या 75 वर्षापर्यंत चालू ठेवण्याचा पर्याय उपलब्ध आहे
- वयाच्या 75 व्या वर्षापर्यंत एकरकमी स्थगिती आणि वार्षिक हप्त्यांमध्ये पैसे काढण्याचा पर्याय उपलब्ध आहे. वयाच्या 75 व्या वर्षापर्यंत वार्षिकी खरेदी पुढे ढकलणे

कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास

- नामनिर्देशित व्यक्ती पेन्शन संपत्तीच्या 100% एकरकमी काढू शकतो
- नामनिर्देशित व्यक्ती कॉर्पस वापरून वार्षिकी खरेदी करण्याचा पर्याय देखील निवडू शकतो

माघार घेणे (60 वर्षांनंतर जॉईन होणे)

3 वर्षे पूर्ण होण्यापूर्वी

- वार्षिकीकरण = किमान 80%
- एकरकमी पैसे काढणे = कमाल 20%
- कॉर्पस ₹ 2.5 लाख पेक्षा कमी असल्यास, संपूर्ण पैसे काढण्याची परवानगी असते

3 वर्षे पूर्ण झाल्यावर आणि 75 वर्षे वयापर्यंत

- वार्षिकीकरण = किमान 40%
- एकरकमी पैसे काढणे = कमाल 60%
- कॉर्पस ₹ 5 लाख पेक्षा कमी असल्यास, संपूर्ण पैसे काढण्याची परवानगी असते

कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास

- नामनिर्देशित व्यक्ती पेन्शन संपत्तीच्या 100% एकरकमी काढू शकतो
- नामनिर्देशित व्यक्ती कॉर्पस वापरून वार्षिकी खरेदी करण्याचा पर्याय देखील निवडू शकतो

पुढे ढकलण्याचा पर्याय

सेवानिवृत्तीनंतर, तुम्ही तुमची पेन्शन आणि एकरकमी पैसे काढणे 75 वर्षांपर्यंत पुढे ढकलू/नंतर काढू शकता.

आंशिक पैसे काढणे

खाली दिलेल्या परिस्थितीत तुमच्या सदस्यत्वाच्या काळात तीन वेळा आंशिक पैसे काढता येतात.

- मुलांचे उच्च शिक्षण किंवा त्यांचे लग्न
- स्वतःच्या नावावर घर खरेदी किंवा बांधकाम
- तुमच्यासाठी आणि तुमच्या प्रियजनांसाठी हॉस्पिटलायझेशनची गरज भासल्यास
- एनपीएस(NPS) चे सदस्यत्व घेतल्यानंतर किमान 3 वर्षे पूर्ण झाल्यानंतर
- प्रत्येकवेळी पैसे काढणे तुमच्या स्वतःच्या कॉंट्रिब्युशनच्या 25% पेक्षा जास्त नसावे
- 75% पेक्षा जास्त अपंगत्व
- कोणत्याही विशिष्ट आजाराचा उपचार
- कौशल्य विकास/पुन्हा कौशल्य (स्किल-डेव्हलपमेंट / रिस्कीलिंग) किंवा इतर कोणतेही स्वयं-विकास उपक्रम (सेल्फ-डेव्हलपमेंट ॲक्टिव्हिटीज)
- तुमचा स्वतःचा उद्यम (व्हेंचर) किंवा कोणत्याही स्टार्टअपची स्थापना

मित्रांनो, फक्त लक्षात ठेवा, तुमच्या सदस्यत्वाच्या कार्यकाळात जास्तीत जास्त तीन वेळा पैसे काढण्याची परवानगी असते.

नामनिर्देशित व्यक्ती निवडताना

असे समजा की सेवानिवृत्तीनंतरच्या तुमच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी तुम्ही मुबलक पैसे गुंतवले आहेत; परंतु सेवानिवृत्तीपूर्वी किंवा सेवानिवृत्तीनंतर तुमचे दुर्दैवी निधन झाल्यास या जमा झालेल्या पेन्शनचे काय होईल, असे वाटणे साहजिक आहे. काळजी करू नका, एनपीएस(NPS) तुम्हाला तुमची सेवानिवृत्तीची रक्कम प्राप्त करण्यासाठी नामनिर्देशित व्यक्ती निवडण्याचा पर्याय देते.

तुम्ही तुमचा नामनिर्देशित व्यक्ती पुढीलप्रमाणे निवडू शकता

01 नामनिर्देशित व्यक्ती म्हणून तीन व्यक्तींची निवड करता येऊ शकते. अल्पवयीन व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी तिची जन्मतारीख आणि पालकांचा तपशील आवश्यक असतो

02 पीओपी(POP) ला विनंती फॉर्म पाठवून नॉमिनी(कायदेशीर वारसाची निवड करता येते किंवा इएनपीएस(eNPS) द्वारे ऑनलाईन अकाऊंट सुरू केले असल्यास ऑनलाईन विनंती सबमिट करता येते. नॉमिनी(कायदेशीर वारसा)चे तपशील नंतर ऑनलाईन बदलले जाऊ शकतात

मोबाईल ॲप आणि ऑनलाईन सुविधा

एनपीएस(NPS)शी निगडित ऑनलाईन आणि ऑफलाईन प्रक्रिया विस्तृत स्वरूपाची असल्याने एनपीएस(NPS)ने वापरकर्त्यांसाठी सोईस्कर असे एक मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे.

एनपीएस(NPS) मोबाईल ॲपचे फायदे

तुमच्या सीआरए(CRA) ने प्रदान केलेल्या मोबाईल ॲपद्वारे एनपीएस(NPS) अकाऊंटमध्ये प्रवेश करा

तुमचे टियर I* आणि टियर II** फंड चेक करू शकता तसेच तुमच्या शेवटच्या पाच ट्रँजॅक्शन्सची माहिती मिळवू शकता

तुमच्या टियर II** अकाऊंट मधील रक्कम सहजपणे पैसे काढू शकता

प्रोफाईल सर्च करून तुम्ही तुमचा रजिस्टर्ड मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी असे तपशील बदलू शकता

विशिष्ट कालावधीतील अकाऊंट स्टेटमेंटस् विनंती सबमिट करून मिळवू शकता



*टियर I अकाऊंट तुमच्या पेन्शन बचतीसाठी आहे ज्यामध्ये तुम्हाला करात सवलत मिळते
**तुम्हाला अतिरिक्त गुंतवणूक बचत करायची असल्यास, त्यासाठी टियर II अकाऊंट आहे. या अकाऊंटमधून पैसे काढण्यावर कोणतेही बंधन नाही; (परंतु या अकाऊंटमधील गुंतवणुकीवरील कर लाभ फक्त सरकारी कर्मचाऱ्यांसाठी लागू आहेत)

इएनपीएस(eNPS) द्वारे नोंदणी केली असल्यास तुमच्या सेंट्रल रेकॉर्डकीपिंग एजन्सीचे (सीआरए / CRA) वेबसाईट पोर्टल वापरून किंवा पीओपी(POP) द्वारे नोंदणीकृत असल्यास पीओपी(POP) च्या वेबसाईट पोर्टलचा वापर करून एनपीएस(NPS) ऑनलाईन सेवांच्या फायद्यांची माहिती घेऊया.

- एनपीएस(NPS)अंतर्गत तुमचे पेन्शन अकाऊंट उघडा (टियर I आणि टियर II दोन्ही)
- तुमचे एनपीएस(NPS) अकाऊंट ऑनलाईन उघडण्यासाठी येथे क्लिक करा Fenps.nsdl.com/eNPS/OnlineSubscriberRegistration.html?appType=main
- तुमचा ईमेल ID आणि मोबाईल नंबर अशी वैयक्तिक माहिती अपडेट करा
- तुम्ही निवडलेल्या योजनेत बदल करू शकता
- तुमच्या टियर I आणि टियर II खात्यांमध्ये सुरुवातीचे आणि त्यानंतरचे कॉंट्रिब्युशन्स जमा करत रहा
- तुमच्या अकाऊंटचे डिटेल्स आणि ट्रँझॅक्शन्स स्टेटमेंट पाहू शकता
- ऑनलाईन सुविधांचा वापर करून टियर II अकाऊंट मधून पैसे काढण्याची विनंती करू शकता

सेंट्रल रेकॉर्ड किपिंग एजन्सी (सीआरए/CRA)

एनपीएस(NPS) खात्यातील गुंतवणुकीची माहिती मिळवायची असल्यास तुम्ही पीआरएएन (PRAN) किट सोबत दिलेला लॉगिन ID आणि पासवर्ड वापरून आपल्या एनपीएस(NPS) अकाऊंटमध्ये लॉगिन करून ही माहिती मिळवू शकता.

या सर्व फायद्यांसह एनपीएस(NPS)ची कार्यसुलभता खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. एनपीएस(NPS) तुम्हाला अनेक प्रकारे तक्रारी मांडण्याचीही परवानगी मिळते.

सीआरए(CRA) ला लिखित स्वरूपात निवेदन पाठवणे

सेंट्रल ग्रीव्हन्स मॅनेजमेंट सिस्टम (सीजीएमएस /CGMS) च्या सीआरए(CRA) कडे फॉरवर्ड करण्यासाठी पीओपी(POP) सेवा प्रदात्यांकडे तुमची तक्रार विहित नमुन्यात सबमिट करा



कॉल सेंटर/इंटरॅक्टिव्ह व्हॉईस रिस्पॉन्स सिस्टम (आयव्हीआर/IVR)

तुम्ही पीएफआरडीए (PFRDA) कॉल सेंटरला टोल फ्री नंबर 1800-110-708 वर संपर्क साधू शकता.



वेब- आधारित इंटरफेस

तुमच्या तक्रारी नोंदवण्यासाठी तुम्ही सीआरए(CRA) कॉल सेंटरवर टेली-क्वेरी पर्सनल आयडेंटीफिकेशन नंबर (टी-पिन /T-PIN) वापरून टोल-फ्री नंबर (022) 24993499 डायल करू शकता. याशिवाय www.npscra.nsdl.co.in ला भेट देऊन तुमचा इंटरनेट पर्सनल आयडेंटीफिकेशन नंबर (आय-पिन/I-PIN) वापरूनही नोंदणी करू शकता.

सीआरए(CRA) पोर्टेबिलिटी: ऑल सिटीझन ते कॉर्पोरेट मॉडेल किंवा कॉर्पोरेट ते ऑल सिटीझन मॉडेल असा सदस्यता प्रकारातील बदल आवश्यक असल्यास सीआरए(CRA)मध्ये सहजतेने बदल करा.

वार्षिकी

हा शब्द या लेखात यापूर्वी काहीवेळा वापरला गेला आहे परंतु त्याचा नक्की अर्थ काय आहे हे तुम्हाला माहीत आहे का?

वार्षिकी ही एकरकमी गुंतवणुकीच्या बदल्यात भविष्यात नियमित परतावा देण्यासाठी डिझाइन केलेली उत्पादने असतात. तुमच्या बचतीचे वार्षिकीकरण करून तुम्ही तिची आजीवन टप्प्याटप्प्यांमध्ये मिळणाऱ्या परताव्यासाठी देवाणघेवाण करू शकता.

विविध फायदे देणारे वार्षिकीचे अनेक प्रकार आहेत.

01 **समान दराने आयुष्यभर जमा करावी लागणारी** वार्षिकी/पेन्शन.

02 **5, 10, 15 किंवा 20 वर्षांसाठी निश्चित** रक्कम आणि त्यानंतर व्यक्ती जिवंत असेपर्यंत देय असणारी वार्षिकी.

03 व्यक्तीच्या **मृत्यूनंतर खरेदी किमतीचा रिटर्न देऊन** आयुष्यभर जमा करावी लागणारी वार्षिकी.

04 आयुष्यभर जमा करावी लागणारी **वार्षिकी 3% प्रतिवर्ष या सरळव्याज दराने वाढत जाते.**

05 व्यक्तीच्या मृत्यूनंतर **पती/पत्नीस त्यांच्या हयातीत 50% वार्षिकीच्या रिटर्नची तरतूद.**

06 व्यक्तीच्या **मृत्यूनंतर पती/पत्नीस त्यांच्या हयातीत 100% वार्षिकीच्या रिटर्नची तरतूद.**

07 व्यक्तीच्या **पती/पत्नीस त्यांच्या हयातीत 100% वार्षिकीच्या रिटर्नची तरतूद; दोघांपैकी एकाचा मृत्यू झाल्यास दुसऱ्या व्यक्तीस खरेदी किंमत परत केली जाईल.**

मनीराम मंत्र

- एनपीएस(NPS) मध्ये गुंतवणुकीचे दोन पर्याय आहेत - **ॲक्टिव्ह चॉईस (सक्रिय निवड) आणि ऑटो चॉईस (स्वयं निवड).**
- सामान्य व्यक्ती आणि कॉर्पोरेट कर्मचारी यांना एनपीएस(NPS) करात **वेगवेगळी सवलत** मिळते.
- एनपीएस(NPS) मधील वार्षिकी हा तुमच्या सेवानिवृत्ती निधीमधील गुंतवणूकीचा एक प्रकार आहे जो **निर्धारित कालावधीसाठी किंवा आयुष्यासाठी नियमित रिटर्न देतो.**

प्रकरण 05
अटल पेन्शन योजनेचे फायदे

भारतात असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कित्येक नागरिकांना त्यांच्यासाठी एक पेन्शन योजना आहे याची अजूनही कल्पना नाही, हे तुम्हाला माहीत आहे का?

अटल पेन्शन योजना (एपीवाय/APY) ही तीच सुपरस्टार योजना आहे जिच्याबद्दल मी आज तुम्हाला माहिती देणार आहे.

एपीवाय (APY) चे फायदे आणि त्यामुळे लोकांच्या आयुष्यात झालेला बदल पाहता सेवानिवृत्तीनंतरचा काळही शांतता आणि सुखाचे वरदान घेऊन येईल यात कसलीही शंका नाही.

एपीवाय (APY) योजनेची माहिती पुढीलप्रमाणे.

एपीवाय (APY) ही लाभार्थींना दर महिना पेन्शन देण्यासाठी वचनबद्ध असलेली सरकारी योजना आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी दरमहा रू. 1000, रू. 2000, रू. 3000, रू. 4000 किंवा रू. 5000 पेन्शन मिळू शकते.



कॉंट्रीब्युशनची रक्कम निवडलेल्या पेन्शनची रक्कम आणि लाभार्थी व्यक्तीचे योजनेत सामील होत असताना असलेले वय यावर ठरवली जाते.

कुठल्याही व्यक्तीला औपचारिक पेन्शन तरतुदीनुसार कोणालाही आणि प्रत्येकाला नियमित मासिक पेन्शन उपलब्ध करून देणे आणि गरजा भागवण्यासाठी खर्च करण्यास मदत करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.



तुमचे वय 18 ते 40 च्या दरम्यान असल्यास तुम्ही एपीवाय (APY) साठी मध्ये सामील होऊ शकता. तुम्ही लवकर सुरुवात केली तर तुमचे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य शांततामय असेल.

नॅशनल पेन्शन स्कीम प्रमाणेच एपीवाय (APY) खाते उघडण्याचे दोन मार्ग आहेत - ऑनलाईन आणि ऑफलाईन.

1. **ऑफलाईन**

- ज्या बँकेत तुमचे सेव्हिंग अकाऊंट आहे त्या बँकेत जा
- एपीवाय (APY) रजिस्ट्रेशन अर्ज भरून जमा करा आणि केवायसी (KYC) प्रक्रिया पूर्ण करा
- आधार कार्ड सारखी महत्त्वपूर्ण कागदपत्रे जवळ बाळगा

2. **ऑनलाईन**

तुमच्या बँकेतर्फे पुरवल्या जाणाऱ्या नेट बँकिंग सुविधेच्या मदतीने एपीवाय (APY) अकाऊंट जलद आणि सुलभरित्या उघडता येऊ शकते. APY अकाऊंट रजिस्टर करण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा :
https://enps.nsdl.com/eNPS/ApySubRegistration.html

एपीवाय (APY) अकाऊंट कशा पद्धतीने हाताळावे याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे.

- बँकेतर्फे देण्यात येणाऱ्या ऑटो-डेबिट(स्वयंचलितपणे पैसे जमा करण्याची) सुविधेचा पर्याय निवडून तुम्ही एपीवाय (APY) अकाऊंटमध्ये कॉंट्रीब्युट करू शकता
- विलंब शुल्क (लेट फी) भरावे लागू नये यासाठी देय तारखेदिवशी तुमच्या सेव्हिंग अकाऊंटमध्ये शिल्लक ठेवा
- दरवर्षी एप्रिल महिन्यातील संचय टप्प्यात(ॲक्युमलेशन फेजमध्ये) तुम्ही तुमची पेन्शन रक्कम वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा पर्याय निवडू शकता
- वय वर्षे साठ झाल्यानंतर दरमहा गॅरंटेड पेन्शन मिळण्यासाठी विनंती दाखल करणे गरजेचे आहे
- मृत्यू अथवा गंभीर आजाराचा अपवाद वगळता वयाची साठ वर्षे पूर्ण होण्याअगोदर तुम्हाला योजनेचे सदस्यत्व रद्द करता येत नाही

3. **eAPY**

पीएफआरडीए (PFRDA) ने आता डिजिटल पद्धतीने एपीवाय (APY) खाते उघडता येईल अशी व्यवस्था केली आहे. इएपीवाय(eAPY) द्वारे सदस्यांना मिळणाऱ्या विविध फायद्यांची माहिती पुढील प्रमाणे.

- संपूर्ण डिजिटल प्रक्रिया
- तुमच्या घर/ऑफिस मधून 24/7 नावनोंदणीची आरामदेय व्यवस्था; बँकेच्या शाखेत जाण्याची गरज नाही
- कागदोपत्री नोंदणीकरण करण्याची गरज नाही
- वेळ, मेहनत आणि खर्च यांची बचत

डिजिटल प्रक्रियेमुळे पीओपी-एसपीएस(POP-SPs) ना ही मदत होते. उदाहणार्थ.

- सोर्सिंगच्या अतिरिक्त माध्यमाची उपलब्धता
- कोणत्याही मानवी हस्तक्षेपाविना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात माहितीचे आदान-प्रदान
- कुठल्याही भौगोलिक क्षेत्रातील सदस्यांपर्यंत पोहोचण्याच्या क्षमतेमुळे तळागाळापर्यंत विस्तार
- वेळ आणि श्रम यांची बचत
- कागदपत्रे सांभाळण्याची आवश्यकता नाही
- नावनोंदणी अधिक सुलभ पद्धतीने करता यावी यासाठी लीड जनरेशन मॉड्युलचा अवलंब

खालील सारणीत एपीवाय (APY) अकाऊंटहोल्डरचे वय, योजनेला जॉईन होत असतांनाची तारीख आणि मासिक काँट्रीब्युशनची रक्कम यांच्या आधारे एपीवाय (APY) अकाऊंट कसे कार्य करेल हे सादर केले आहे.

	अपेक्षित मासिक पेन्शन	₹ 1,000	₹ 2,000	₹ 3,000	₹ 4,000	₹ 5,000
	नामनिर्देशित वारसाला मिळणारा परतावा	₹ 1.7 लाख	₹ 3.4 लाख	₹ 5.1 लाख	₹ 6.8 लाख	₹ 8.5 लाख
योजनेत सामील होण्याचे वय (वर्षे)	योगदानाची एकूण वर्षे	सूचक मासिक योगदान (₹)	सूचक मासिक योगदान (₹)	सूचक मासिक योगदान (₹)	सूचक मासिक योगदान (₹)	सूचक मासिक योगदान (₹)
18	42	42	84	126	168	210
19	41	46	92	138	183	228
20	40	50	100	150	198	248
21	39	54	108	162	215	269
22	38	59	117	177	234	292
23	37	64	127	192	254	318
24	36	70	139	208	277	346
25	35	76	151	226	301	376
26	34	82	164	246	327	409
27	33	90	178	268	356	446
28	32	97	194	292	388	485
29	31	106	212	318	423	529
30	30	116	231	347	462	577
31	29	126	252	379	504	630
32	28	138	276	414	551	689
33	27	151	302	453	602	752
34	26	165	330	495	659	824
35	25	181	362	543	722	902
36	24	198	396	594	792	990
37	23	218	436	654	870	1087
38	22	240	480	720	957	1196
39	21	264	528	792	1054	1318
40	20	291	582	873	1164	1454

मला असे वाटते की एपीवाय (APY) च्या क्षमतेबद्दल तुम्हाला कसलीही शंका उरली नसावी, तरीही मी तुम्हाला अधिक माहिती देऊ इच्छितो. कोणत्याही गोष्टीच्या केवळ माहिती पेक्षा अधिक माहिती असणे कधीही चांगले.

1. लाभार्थी व्यक्तीचा मृत्यू झाल्यास

- तुमच्या मृत्यूनंतर तुमची 100% पेन्शन तुमच्या पती/पत्नीला देय असेल. तुमच्या पती/पत्नीच्या मृत्यूनंतर या पेन्शनच्या वार्षिक योगदानासाठी वापरली जाणारी रक्कम नामनिर्देशित व्यक्तीला प्रदान केली जाईल.
- तुमच्या पती/पत्नीकडे तुमचे एपीवाय (APY) अकाऊंट सुरू ठेवण्याचा किंवा बंद करण्याचा पर्याय उपलब्ध असेल आणि तुमचे योगदान तसेच कोणताही लाभ त्यांना प्राप्त करता येईल.

2. निवृत्तीनंतरचे लाभ

- वय वर्षे 60 नंतर मिळणाऱ्या मासिक पेन्शनची सरकारकडून मिळणारी हमी हा एपीवाय(APY) मधून होणारा मुख्य फायदा आहे. ही मासिक पेन्शन तुम्ही दिलेल्या मासिक हफ्त्याच्या रकमेवर अवलंबून असेल.

3. आयकरात सवलत

- कलम 80C अंतर्गत केलेल्या काँट्रीब्युशनसाठी आयकरात सवलत मिळू शकते.

मनीराम मंत्र

तुमचे एकूण योगदान आणि निवडलेली पेन्शन रक्कम या आधारे एपीवाय(APY) **सरकारी हमीसह पेन्शन** प्रदान करते.

तुमचे **वय 18 ते 40 च्या** दरम्यान असल्यास एपीवाय(APY) योजनेत सामील व्हा.

एपीवाय(APY) **तीन फायद्यांची हमी देते**.

समारोप

मला आशा आहे की तुम्हाला हे पुस्तक वाचून उपयुक्त माहिती मिळाली असेल. मला असे वाटते की हे पुस्तक सर्वसमावेशक असून सेवानिवृत्ती नियोजन, भविष्यासाठी बचत, एनपीएस(NPS), एपीवाय(APY) आणि या सर्व योजनांमुळे होणारे असंख्य फायदे याबद्दल उपलब्ध असलेली सर्व माहिती प्रदान करण्यात यशस्वी ठरले आहे.

जाता जाता, मी तुमच्या सेवानिवृत्तीच्या नियोजनाचे महत्त्व पुनःश्च एकदा अधोरेखित करेन. तुम्ही कितीही तरुण किंवा प्रौढ असलात तरी लवकर सुरुवात केल्यास तुम्हाला अधिक फायदे मिळतील. एनपीएस(NPS) आणि एपीवाय(APY) हे सेवानिवृत्तीचे नियोजन करण्यासाठी तुमची नेहमीच उपयोगी ठरतील. तुमचे निवृत्तीनंतरचे आयुष्य समाधानाने व्यतीत व्हावे यासाठी असणाऱ्या अनेक पेन्शन योजनांपैकी तुम्ही कुठल्याही योजनेची निवड करू शकता. मग कशाची वाट पाहत आहात? आत्ताच प्रारंभ करा. तुम्ही माझ्याशी नेहमी **011-26517501-03** इथे संपर्क साधू शकता.

लक्षात ठेवा, तुमच्या नोकरीतून फक्त सेवानिवृत्त होऊ नका, तुमच्या सेवानिवृत्तीची नियोजन करा.

एनपीएस(NPS) आणि एपीवाय(APY) सारख्या योजनांचा लाभ घ्या.

पीएफआरडीए (PFRDA) कधीही कोणत्याही व्यक्तीला 'एनपीएस(NPS)/पीएफआरडीए(PFRDA) कडून निधी मिळविण्यासाठी पैसे जमा करा' अशी विनंती करणारा कॉल करत नाही. फसवणुकीच्या उद्देशाने करण्यात आलेल्या अशा कोणत्याही संभाषणाची माहिती पोलिसांना तात्काळ दिली जाऊ शकते.

संज्ञांची शब्दसूची

A

ॲसेट
ज्या संसाधनांची मालकासाठी आर्थिक किंमत असते. यात रोकड, गुंतवणूक, सिक्युरिटीज किंवा रिअल इस्टेट या प्रकाराचा समावेश होतो

ॲन्युइटी
ॲन्युइटी किंवा वार्षिकी हा विमा खरेदी करताना निवडलेल्या कालावधीसाठी ग्राहकाला नियमित पेमेंट करण्यासाठी विमा कंपनीने केलेला करार असतो

ॲसेट अलोकेशन
मालमत्तेच्या विविध कॅटेगरीमध्ये इंव्हेस्टमेंट पोर्टफोलिओचे विभाजन

ॲन्युटंट
ज्या व्यक्तीला ॲन्युइटी किंवा वार्षिकी मिळणारी आहे ती व्यक्ती

अटल पेन्शन योजना
टल पेन्शन योजना (एपीवाय / APY) ही नियमित काँट्रीब्युशनवर आधारित पेन्शन योजना आहे, यात ₹ 1,000 / 2,000 / 3,000 / 4,000 /5,000 च्या पेन्शनची हमी असते. वयाच्या 60 व्या वर्षी पेन्शन सुरू होते

B

बॉंड
एक कर्जाचे साधन ज्यात गुंतवणूकदार एखाद्या कर्ज घेणाऱ्या संस्थेला ठराविक कालावधीसाठी बदलत्या किंवा निश्चित व्याज दराने निधी उधार पैसे देतो त्याला बॉंड असे म्हणतात

C

कॉर्पस
सर्व गुंतवणूकदारांनी एखाद्या विशिष्ट योजनेत गुंतवलेली एकूण रक्कम

कंपाऊंडिंग
कमाई निर्माण करण्याची एखाद्या मालमत्तेची असलेली क्षमता, जिची कमाई निर्माण करण्यासाठी पुन्हा गुंतवणूक केली जाते

E

इक्विटीज
रिअल इस्टेट आणि सामान्य स्टॉक ही इक्विटीची उदाहरणे आहेत ज्यात गुंतवणूकदारांना ठराविक भागाची मालकी मिळते

H

हेल्थ इंश्युरन्स
हा एक करार असतो ज्याप्रमाणे विमा कंपनी वैद्यकीय कारणांसाठी खर्चाच्या रक्कम ग्राहकाला देते

I

इंफ्लेशन
वस्तू आणि सेवांच्या किमतींत सामान्य वाढ झाल्यामुळे क्रयशक्ती कमी होणे

L

लम्प सम
एकाच पेमेंटमध्ये आर्थिक योजनेअंतर्गत जमा झालेल्या लाभांचे वितरण

लाईफसायकल फंड
गुंतवणूकदाराच्या अपेक्षित सेवानिवृत्तीच्या वयावर आधारित मालमत्ता वाटप राखणारा म्युच्युअल फंड

लोन
एखाद्या वित्तीय संस्थेकडून/व्यक्तीकडून उधार घेतलेली, व्याजासह परत करण्याची रक्कम

M

मार्केट-लिंक्ड इंव्हेस्टमेंट्स
Tहे कर्जरोखे किंवा बॉंड्स असतात, यांचे रिटर्न्स दुसऱ्या एखाद्या मालमत्तेपासून होणाऱ्या उत्पन्नावर निगडित असतो

N

नॅशनल पेन्शन सिस्टीम
नॅशनल पेन्शन सिस्टीम (एनपीएस/ NPS) ही एक सेवानिवृत्ती बचत योजना आहे जी प्रत्येकाला पुरेसे सेवानिवृत्तीनंतर उत्पन्न प्रदान करते. ही योजना लोकांना त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करते

P

पॉईंट ऑफ प्रेझेन्स
पॉईंट ऑफ प्रेझेन्स हे एनपीएस (NPS) अंतर्गत ग्राहक/संभाव्य सदस्यांना त्यांच्या पीओपी (POP)सर्व्हिस प्रोव्हाडर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाखांच्या नेटवर्कद्वारे सेवा पुरवणारे वितरण चॅनेल आहे

पेन्शन
सेवानिवृत्तीनंतर एखाद्या व्यक्तीला राज्य किंवा माजी नियोक्त्याद्वारे नियमितपणे दिली जाणारी ठराविक रक्कम असते

पेआऊट
एखाद्याला भरपाई किंवा लाभांश म्हणून दिलेली मोठी रक्कम

पार्शिअल विथड्रॉल / आंशिक पैसे काढणे
पॉलिसीच्या मुदत काळादरम्यान पॉलिसीधारकाने पॉलिसीच्या निधीमधून काढलेला भाग (आंशिक पैसे)

R

रेग्युलेटरी बॉडी
मानवी उपक्रमाच्या कायदेशीररित्या दुर्लक्षित पैलूंसाठी जबाबदार असणारी सार्वजनिक संस्था किंवा सरकारी एजन्सी

रिटर्न ऑन इंव्हेस्टमेंट
गुंतवणुकीवर प्रतिलाभ (रिटर्न ऑन इंव्हेस्टमेंट/ आरओआय / ROI) हे गुंतवणुकीवरील नफा किंवा कार्यक्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी वापरले जाणारे मापक आहे

रिस्क्स
आर्थिक साधनाचा प्रतिलाभ मिळण्याचा दर अस्थिर असण्याची शक्यता आणि यात क्वचितप्रसंगी तोटादेखील होऊ शकतो

S

एस2 फॉर्म
हा फॉर्म ग्राहकांच्या वैयक्तिक माहितीत बदल/दुरुस्ती, नामनिर्देशित व्यक्तीची माहिती, आय-पिन/टी-पिन(I-Pin/T-Pin) किंवा पीआरएएन (PRAN) कार्ड पुन्हा जारी करण्याच्या विनंतीसाठी वापरला जातो

सर्व्हिस प्रोव्हायडर
रेकॉर्ड-कीपिंग, योजनेविषयी माहिती आणि आर्थिक योजनेचे प्रशासन यास्वरूपात सेवा पुरवणारी कंपनी किंवा फर्म

सुपरॲन्युएशन/सेवानिवृत्ती निधी
एखादी व्यक्ती कार्यरत असतांना ती एखाद्या योजनेत गुंतवत असलेला निधी ज्याचे पैसे या व्यक्तीने वृद्धापकाळात काम करणे थांबवल्यास मिळतील

T

टायर-1 एनपीएस (NPS)अकाऊंट
हा एनपीएस (NPS) खात्यांचा सर्वात मूलभूत प्रकार आहे. गुंतवणूकदार या खात्यांमध्ये वर्षाला ₹ 1,000 इतकी किमान गुंतवणूक करू शकतात

टॅक्स बेनिफीट/करात सवलत
एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला सामान्यतः विशिष्ट परिस्थितीत भरावे लागणाऱ्या कराच्या रकमेत मिळणारी सवलत

V

व्हॅल्युएशन/ मूल्यांकन
व्हॅल्युएशन किंवा मूल्यांकन हे मालमत्तेचे विद्यमान मूल्य मोजण्याचे कॅल्क्युलेशन

अटल पेन्शन योजना
ऑनलाइन एपीवाय(APY) सदस्य नोंदणी
enps.nsdl.com/eNPS/ApySubRegistration.html

तुमचे वय 18 ते 40 वर्षांच्या दरम्यान असल्यास तुम्ही अटल पेन्शन योजनेत सामील होऊ शकता.
तुमच्या जवळच्या बँक/ पोस्ट ऑफिसशी संपर्क साधा, 18008891030 (टोल-फ्री) वर कॉल करा किंवा आजच www.pfrda.org.in ला भेट द्या.

नॅशनल पेन्शन सिस्टीम
तुमचे एनपीएस(NPS) अकाऊंट ऑनलाईन उघडा
www.npstrust.org.in/content/open-your-nps-account-online

एनपीएस(NPS) किंवा तुमच्या जवळच्या POP-SP (डिस्ट्रीब्युटर) बद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आमच्या टोल फ्री नंबर 1800222080 वर कॉल करा, 'NPS' असा 56677 वर एसएमएस(SMS) करा किंवा www.pfrda.org.in ला भेट द्या.

आर्थिक साक्षरता आणि प्रशिक्षण विभाग, PFRDA.

"In case of any ambiguity in understanding the context of the words written in this booklet, the English version of the same will prevail"
"या पुस्तिकेमधील कोणत्याही शब्दाचा अर्थ समजण्यामध्ये काही अस्पष्टता निर्माण झाल्यास, याची इंग्रजी आवृत्ती प्रचलित मानली जाईल"